# कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो-३ मार्ग

श्री. आर. रमणा यांची संचालक (नियोजन आणि रिअल इस्टेट डेव./NFBR) तर श्री. राजीव यांची संचालक (प्रणाली आणि संचलन व देखभाल) पदी नियुक्ती

मुंबई, १६ जून, २०२३ : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (मुं.मे.रे.कॉ.) च्या वतीने श्री. आर. रमणा यांची संचालक (नियोजन आणि रिअल इस्टेट डेव./NFBR) तर श्री. राजीव यांची संचालक (प्रणाली आणि संचलन व देखभाल) (Operation and Maintenance) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

शहर नियोजन, वाहतूक व परिवहन, वाहतूक आणि प्रादेशिक नियोजन, वित्त, पायाभूत सुविधांची अंमलबजावणी आणि शहरी महामार्ग अशा विविध प्रकल्पांच्या कामाचा श्री. रमणा यांना तीन दशकांहून अधिक काळाचा दांडगा अनुभव आहे. मुं.मे.रे.कॉ.मध्ये साधारण ९ वर्ष श्री. रमणा हे कार्यकारी संचालक (नियोजन) पदी कार्यरत होते. या दरम्यान त्यांनी मुंबई मेट्रो-३ मार्गाची अंमलबजावणी, भूसंपादन, पुनर्वसन, पर्यावरण आणि इंटरमॉडल एकत्रीकरण (Intermodal Integration) संबंधीत कामे हाताळली. याशिवाय मुंबई मेट्रो मास्टर प्लॅनिंग, डीपीआर आणि मुंबई २ व ३ च्या विशिष्ट मार्गाच्या अंमलबजावणीमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा होता. तसेच त्यांनी उच्च न्यायालयात समिती सदस्य म्हणूनही जबाबदारी पार पाडली. अनेक सार्वजनिक सल्ला प्रक्रियांमध्ये त्यांनी सहभाग दर्शवला असून आयआयटी बॉम्बे येथे बाह्य परीक्षक म्हणूनदेखील काम पाहिले.

श्री. राजीव यांनी १९९५ साली भारतीय रेल्वेमधून आपल्या कारकिर्दीला सुरूवात केली. या २० वर्षाच्या कालावधीत त्यांनी महत्वाच्या विविध पदांवर कार्यभार सांभाळला. त्यांना रेल्वे आणि मेट्रो रेल्वे प्रणालीतील रोलिंग स्टॉक, ओव्हरहेड ट्रॅक्शन, वीज पुरवठा तसेच इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल (E & M) संबंधीत जवळपास तीन दशकांच्या कामाचा अनुभव आहे. श्री. राजीव यांनी त्यांच्या कार्यकाळात मध्य रेल्वेत उपमुख्य दक्षता अधिकारी (विद्युत) पदावर ५ वर्ष कार्यभार सांभाळला. त्यानंतर मार्च २०१६ साली ते मुं.मे.रे.कॉ.मध्ये महाव्यवस्थापक (रोलिंग स्टॉक) पदी रुजू झाले. पुढे त्यांनी कार्यकारी संचालक (रोलिंग स्टॉक) म्हणून पदभार स्वीकारला. दरम्यान त्यांनी मुं.मे.रे.कॉ.च्या रोलिंग स्टॉक, डेपो प्लांट आणि इक्विपमेंट अँड ऑपरेशन्स (Equipment & Operations) विभागाचे प्रमुख म्हणून कामकाज पाहिले. या अंतर्गत श्री. राजीव यांनी संचलन व देखभाल (Operation and Maintenance) संबंधीत कामाच्या विविध जबाबदाऱ्या पार पाडल्या. *(समाप्त)*


For further information please contact: -

Niti Tamse/AM (PR)
8369727364/9664215544
niti.tamse@mmrcl.com

Vaidehi Khadse/Sr. AGM (PR)
9028543087
vaidehi.more@mmrcl.com